13 JUL 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निवडणुकांच्या तारखांकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष

## विद्यापीठाकडे ११ हजार नूतन नावनोंदणी : अर्जांची छाननी सुरू, विद्यार्थी संघटनांच्या बैठकांना जोर, उमेदवारांची चाचपणी सुरू

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

राज्यातील उच्चशिक्षण क्षेत्रात अमूलाग्र बदल करणारे 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक' विधानसभेत एक वर्षापूर्वी मंजूर झाले. त्याची अंमलबजावणी १ मार्चपासून झाल्यामुळे अधिकार मंडळांच्या पदनियुक्त्या आणि महाविद्यालयातील निवडणुकांची नावनोंदणी पूर्ण झाली आहे. तर सर्वच विद्यार्थी संघटनांनी आपआपली प्रचार कार्यालयेही थाटली आहेत. विद्यापीठ प्रशासनाने जय्यत तयारी सुरू केली असून शासनाकडून निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

महाविद्यालय व विद्यापीठ विद्यार्थी मंडळांच्या निवडणुकांचे 'परिनियम' विद्यापीठाला प्राप्त झाले आहेत. त्यामुळे पदवीधरांची नूतन नावनोंदणी पूर्ण झाली असून, यापूर्वी ज्या पदवीधरांनी नावनोंदणी केली आहे, त्यांना नवीन कायद्यानुसार



**विद्यार्थी संघटना निहाय नावनोंदणी**

| | |
|---|---|
| भाजप | ३५० |
| काँग्रेस | ६००० |
| राष्ट्रवादी काँग्रेस | १५०० |
| मनसे | ५०० |
| अभाविप | २००० |

आधारकार्ड, रेशनकार्ड, पॅनकार्ड यापैकी एक ओळखपत्र विद्यापीठाकडे जमा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांची २४ जुलैपर्यंत नावनोंदणी सुरू राहणार आहे. नवीन नियमानुसार अनेक जुन्या विद्यार्थ्यांचा पत्ता कट होण्याची शक्यता असल्याने विद्यार्थी संघटनांमध्ये नाराजीचा सुर आहे. पदवीधर नावनोंदणी पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालय व विद्यापीठ निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार आहे. निवडणुकीसाठी इच्छुक विद्यार्थी, संघटनांच्या संपर्कात आहेत. जी संघटना न्याय देईल, त्या संघटनेबरोबर जाण्याची तयारी असल्याचे इच्छुकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. निवडणुका कशा घ्यायच्या याची अंतर्गत तयारी विद्यापीठाने सुरू केली आहे. तर विद्यार्थी संघटनांनी विद्यार्थी निवडणूकांची मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

२०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील सर्व परिषदांसाठीचे परिनियम विद्यापीठांना प्राप्त झाले आहेत. विद्यार्थी संघटनांच्या प्राथमिक पातळीवर एकत्रित बैठका सुरू आहेत. त्याबरोबर योग्य उमेदवाराची चाचपणीही सुरू आहे. यावर्षीच्या निवडणूकांसाठी विद्यार्थ्यांना मतदानाचा अधिकार असल्यामुळे यावर्षाच्या निवडणुकांना वेगळीच रंगत येणार आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने इतर विद्यार्थी संघटनांपेक्षा जास्त पदवीधर विद्यार्थ्यांची नावनोंदणी केली आहे. संघटनांनी मात्र २ हजारचा आकडा ओलांडलेला नाही. काही विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठ निवडणूकीत एकत्र येऊन लढण्याची तयारी सुरू केलीं आहे.

### ११ हजार पदवीधर नोंदणी

शिवाजी विद्यापीठाकडे ११ हजार नवीन विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली आहे. प्रशासनाकडे जमा झालेल्या अर्जांची छाननी करण्याचे काम युध्द पातळीवर सुरू आहे. विद्यापीठ निवडणुकांबाबत २९ जून रोजी मुंबईत मंत्रालयात बैठक झाली होती. या बैठकीत निवडणूका कशा घेतल्या पाहिजेत, याविषयी राज्यशासनांकडून राज्यभरातील विद्यापीठ प्रतिनिधींना मार्गदर्शन करण्यात आले.

### ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होईल



डॉ. विलास नांदवडेकर
(कुलसचिव)

विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद, अधिसभा या निवडणुकांसाठी संस्थाचालक प्रतिनिधींची नावनोंदणी संपली आहे. नूतन पदवीधरांची नावनोंदणी संपली असून अर्जांची छाननी सुरू आहे. अर्जांची छाननी झाल्यानंतर तात्पुरती पदवीधर मतदार यादी जाहीर केली जाईल. या यादीवर कोणी आक्षेप घेतल्यास पुन्हा छाननी करून, ३० जुलैच्या अगोदर अंतिम मतदार यादी जाहीर केली जाणार आहे. त्यानंतर ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2017
तरुण भारत

# 'रेरा' कायद्यावर विद्यापीठात रविवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विधी विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व क्रीडाई कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रेरा कायद्यावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात रविवारी (दि. १६) सकाळी ९:३० ते दुपारी २ यावेळेत ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेसाठी रेरा प्राधिकरणाचे न्यायाधीश कापडणीस तसेच नेवगी लॉ फर्मचे ॲड. अभय नेवगी, ग्राहक कायद्यातील तज्ज्ञ ॲड. उदय बावीकर आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायमूर्ती उमेशचंद्र मोरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
13 JUL 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभाग व पुणे येथील क्विक हिल फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १४) 'सी, सी ++ : इंडस्ट्रियल परस्पेक्टीव्ह' या विषयावरील फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे उद्घाटन होणार आहे. तर शनिवारी (दि.१५) कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांना आय. टी. क्षेत्रातील बदलत्या गरजांनुसार अद्यावत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण पाहता विद्यार्थ्यांमध्ये मोफत अभ्यासक्रम पुरवले जाणार आहेत. यासाठी संगणकशास्त्र अधिविभाग मुख्य केंद्र आहे. तरी जास्तीत जास्त प्राध्यापकांनी नावनोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2017

लोकमत

# संगणकशास्त्र विभागात उद्यापासून कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि क्वि कहिल फौंडेशनतर्फे शुक्रवारी (दि. १४) व शनिवारी (दि. १५) विद्यापीठात कार्यशाळा आयोजित केली आहे. 'सी, सी प्लस पल्स : इंडस्ट्रीयल प्रेस्पेक्टीव्ह' असा या कार्यशाळेचा विषय आहे. यामध्ये माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या सी आणि सी प्लस, प्लसबाबतचे मार्गदर्शन केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
१३ JUL २०१९

पुढारी

# सावधान! जीवघेण्या 'सेल्फी'पासून



२१ वे शतक हे मोबाईलचे शतक म्हणून ओळखले जात आहे. मोबाईल म्हटलं की, त्यामधील अत्याधुनिक कॅमेरा ही आजच्या तरुणाईची गरज बनला आहे. प्रत्येकाकडे महागडे मोबाईल पहायला मिळतात. आपल्याजवळील मोबाईल हा संभाषणासाठी असून अलीकडे तो स्टेटस सिम्बॉल बनला आहे. मोबाईलवर 'सेल्फी' काढून तो तत्काळ अपलोड करण्यासाठी युवकांची चढाओढ सुरू असते. आपण घेतलेला सेल्फी चांगला, सुंदर दिसेल यासाठी तरुण युवा पिढी जीव धोक्यात घालायलाही मागेपुढे पाहत नाही. रेल्वे, नदी, गाडी चालवितानाही सेल्फी काढणारे युवक-युवती हमखास पाहायला मिळतात. क्षणिक सुखासाठी ते घरी आपली कोणी वाट पाहत आहे, हेसुद्धा विसरून जातात. गेल्या काही वर्षांत हैद्राबाद, मुंबई, पुणेसह इतर शहरांत कित्येक तरुणांनी सेल्फी काढताना आपले प्राण गमावले आहेत. भारत हा तरुणांचा देश असून २०२० मध्ये देश महासत्ता होणार आहे. जर युवापिढीने आपली विधायक ऊर्जा क्षणिक आनंदासाठी खर्च केल्यास ते चुकीचे ठरेल. आजूबाजूचे लोक तुमच्या सेल्फीने आकर्षित होत नाहीत; पण तुम्ही दुसऱ्यासाठी चांगल्या गोष्टी केल्यास लोकांसाठी तुम्ही आदर्श बनाल.

- **प्रसन्न करमरकर**, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 3 JUL 2017
पुढारी



# इंटरनेट गुरु

गुरुपौर्णिमा नुकतीच साजरी झाली. आयुष्यातल्या प्रत्येक वळणावर मार्ग दाखवणारा, अडचणींच्या वेळी साथ देणारा हा गुरूच असतो. मग ते आई-बाबा, शिक्षक, मित्र किंवा अनुभव असो, प्रत्येक ठिकाणी योग्य मार्ग दाखवणारा हा गुरू असतो. सध्याच्या आधुनिक जगात तंत्रज्ञानाने इंटरनेटच्या माध्यमातून आपल्यापुढं ज्ञानाचं भांडार खुले केले आहे. आपल्याला हवी ती माहिती एका क्लिकवर मिळते. हल्ली शाळा, कॉलेज, क्लासेसमध्येही प्रोजेक्टर लावून लेक्चर घेतले जातात. मोठ्या इन्स्टिट्यूटमध्ये तर ऑनलाईन लेक्चरर्स, व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे शिकवले जाते.

डिजिटल क्लासरूमची संकल्पनाही विविध शाळांमध्ये राबविण्यात आली आहे. नवीन लाँच झालेले ॲप, सोशल साइटस् हेच आता शिष्याचे गुरू बनले आहेत. प्रत्येक तंत्रज्ञानाचे जसे फायदे आहेत तसे तोटेही आहेत. तंत्रज्ञानाचा आपण कसा वापर करतो, त्याच्यावर त्याचे फायदे-तोटे अवलंबून आहेत, एवढं मात्र नक्की. पण, तंत्रज्ञानाचा वापर करून आपली प्रगती कशी साधायची यासाठी मार्गदर्शन करणारी व्यक्तीही आपली गुरू असू शकते. गुरू हे शिष्याची आवड जाणून त्याला मार्गदर्शन करत असतात. लहानपणी चालायला, बोलायला आई-वडील शिकवितात. त्यानंतर आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्ती भेटतात. त्यात मित्र, शिक्षक असे कोणीही असू शकते. गुरू हा पाच प्रकारचा असतो प्रेरक, सूचक, वाचक, दर्शक, बोधक, शिक्षक. प्रत्येक क्षेत्रात पाऊल टाकताना कोणाच्या तरी मार्गदर्शनाची व आधाराची गरज पडते. ते मार्गदर्शक, ती आधार देणारी व्यक्ती आपली गुरूच असते.

- **धनश्री ओतारी**, मास कम्युनिकेशन, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2017

पुढारी

# रोजगारविषयक नवे धोरण गरजेचे : डॉ. देशमुख

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शेतीवरील भार कमी करण्यासाठी योग्य शिक्षण व कौशल्यविकासावर आधारित अभ्यासक्रमावर भर देऊन रोजगारनिर्मितीचे धोरण राबवावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. एस. एम. देशमुख यांनी केले. महावीर महाविद्यालयात आयोजित जागतिक लोकसंख्यादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे होते.

महावीर महाविद्यालयातील लोकसंख्या शिक्षण मंडळ व रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सनराईज यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध स्पर्धा व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. देशमुख म्हणाले, देशातील कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्येचा देशाच्या सशक्तीकरणासाठी कसा उपयोग करून घेता येईल, याबाबत मार्गदर्शन केले. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. सौ. सुजाता पाटील यांनी केले. संजय ओमासे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. रोटरी क्लब ऑफ कोल्हापूरच्या मानद सदस्या डॉ. रूपा शहा यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाची माहिती दिली. सूत्रसंचालन अस्मिता चौगुले यांनी केले, तर आभार अजय नलवडे यांनी मानले. यावेळी रोटरी सनराईजचे अध्यक्ष गौरव शहा, इंद्रजित चव्हाण, प्रसन्न देशिंगकर, मंदार नलावडे, श्रीकांत मोरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2017

पुण्यनगरी

# लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आवश्यक

## - डॉ. जे. एफ. पाटील

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** देशात सर्वात मोठी समस्या लोकसंख्यावाढ हीच आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी नैतिक निर्बंध पाळले पाहिजेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. जे. एफ. पाटील यांनी केले. विवेकानंद कॉलेज येथे अर्थशास्त्र, समाजशास्त्र व भूगोल विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

डॉ. जे. एफ. पाटील पुढे म्हणाले, लोकसंख्येचा हा प्रश्न सोडविण्यासाठी व्यक्तीने सुशिक्षित आणि सुजाण नागरिक होणे गरजेचे आहे. नैसर्गिक आपत्ती, संकट, दुष्काळ, महापुराने लाखो माणसे मृत्युमुखी पडतात. शिवाय रोगराईने आणि कुपोषित होऊनसुद्धा मरतात. हे प्रश्न सोडवायचे असतील, तर लोकसंख्यावाढ आटोक्यात आणणे आवश्यक आहे. प्राचार्य डॉ. होनगेकर यांनी लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक व नोकरीविषयक समस्यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्रास्ताविक भूगोल विभागप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. डॉ. ए. पी. जाधव यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले. प्रा. एस. डी. जोशी, प्रा. वाय. डी. हरतोळे, डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. एस. एस. माळी, प्रा. विकास मस्के, प्रा. सुशील कोरटे, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी तसेच डॉ. डी. ए. देसाई, डॉ. एस. जी. गावडे आदी उपस्थित होते.